
मकरसंक्रांत विशेषांक
महाराष्ट्र मंडळ, डेट्रॉइट
स्नेहबंध
जानेवारी २०१५
“आपले मंडळ महाराष्ट्र मंडळ”
Designer : Gauri Alate

# MICHIGAN PHYSICIANS GROUP

We Care!

*"We are your neighborhood Clinic"*
*We offer same day, weekend, evening appointments and walk in patients.*

**Our Goal is Quality Care for Life!**
Let us help you and your loved ones.
Call to discuss your care!
**Most Insurances Accepted**

**INTERNAL MEDICINE**
Rita P. Shah, MD
Vishnu Reddy, MD
Neelum Gupta, MD
Stephen Senecoff, MD
Bo Duanmu, PA-C, PhD

**FAMILY MEDICINE**
M. J. Knapp, DO

**CARDIOLOGY & VASCULAR MEDICINE**
Dinesh M. Shah, MD, FACC, FSCAI

**NEUROLOGY**
Alka Y. Shah, MD
Zef Lucaj, MD, PhD

**NUCLEAR MEDICINE**
Alka Y. Shah, MD

**SLEEP MEDICINE**
Vishnu Reddy, MD
Alka Y. Shah, MD

**We are an Accredited facility for Cardiology and Nuclear testing. Proud to be designated Patient Centered Medical Home.**

PRIMARY CARE SERVICES
Complete Care Services
Healthy Living Screening
Gynecology
Cancer Screenings
Asthma Screenings

NEUROLOGY
EEG EMG
Consultations
Insomnia

SLEEP SERVICES
Sleep Evaluation Clinic

CARDIOVASCULAR
Venous Doppler
Nuclear Stress Testing
Carotid Doppler
Aneurysm Screening
Stress ECHO
Peripheral Artery Disease Screening
Varicose Vein Screening & Treatment

ON-SITE OUTPATIENT SERVICES
X-ray and Imaging Services
On-site Laboratory
On-site Pharmacy
Coumadin Clinic (Anti-Coagulation)
Advanced Allergy Testing
Osteoporosis Screening
General Ultrasounds

**LOCATIONS**

BERKLEY CLINIC
2905 W. 12 Mile Road
Berkley, MI 48072
T: 248-541-0770

COMPTON CLINIC
14325 Middlebelt Road
Livonia, MI 48154
T: 734-427-9222

SLEEP EVALUATION CENTER
2025 W. Long Lake Road - Ste 106
Troy, MI 48098

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| इवलेसे रोप लावियले द्वारी | ज्योत्स्ना दिवाडकर | पान क्र. ३ |
| मला आवडलेले पुस्तक | माधुरी पेंडसे | पान क्र. ६ |
| माझा अमेरिकेतील पहिला दिवस | रजनी ओक | पान क्र. १० |
| एक प्रसन्न अनुभव | डॉ. श्री ठाणेदार | पान क्र. १६ |
| शब्दकोडे | मेधा उमरजी | पान क्र. १९ |
| खत्री सर | नितीन अंतुरकर | पान क्र. २२ |






संपादक : ज्योत्स्ना दिवाडकर व मुकुल अत्रे

मुखपृष्ट रचना व मांडणी: गौरी अलाटे

मराठी टंकलेखन: प्राची वेसीकर

## इवलेसे रोप लावियेले द्वारी ....



"**पू**र्वी २०० मोदकांत भागायचे, आता गणपतीच्या कार्यक्रमाला ३००० मोदक पुरत नाहीत." पिंजरकर काकूंचे हे विधान ऐकून मी थक्क झाले. १९६०-६५ च्या दरम्यान Detroit परिसरातील- हाताच्या बोटावर मोजण्याइतकी - मराठी लोकं एकत्र आली. गप्पागोष्टी, मराठी जेवण व गाण्याची छोटीशी बैठक या व्यतिरिक्त त्यांचा दुसरा काही उद्देश नव्हता. त्या मंडळींना "मंडळ" म्हणायला सुद्धा काही वर्षं गेली! आणि दिसामाजी काही तरी (मराठी!) लिहावे म्हणून काही हौशी लेखकांनी एक हस्तलिखित काढले. तो अंक म्हणजे आजच्या स्नेहबंधचा मूळपुरुष! कोण्या मिश्किल माणसाने त्याचे नाव 'बोंबाबोंब' ठेवा असे सुचवले. ती सूचना डावलून मग 'उठाठेव' हे नाव ठरले. नाही तरी ह्या नसत्या उठाठेवी केल्याशिवाय मराठी माणसाला चैन पडतच नाही.

या घटनेला आता ४०हून अधिक वर्षं झाली. मराठी मंडळाचा वेलू आता गगनावरी गेला आहे!महाराष्ट्रात गाजलेली नाटकं इथे येतात; रंगभूमीवरील अतिरथी - महारथी Detroitकरांची दाद व पाहुणचार यावर प्रसन्न होत्साते परत जातात. खुद्द Detroit मधल्या मराठी रंगभूमीने देशभर नाव केले आहे. कोजागिरीला इथे चारी ठाव गाण्याची मैफिल भरते. संक्रांतीच्या कार्यक्रमाला .... बघालच आता!

मंडळाचा विस्तार आणि आवाका इतका वाढला आहे की वर्षभराच्या कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आता कार्यकारिणीच्या एक मोठी आणि ४ छोट्या सभा भरतात. व्यवस्थापन व तंत्रज्ञान यात निष्णात असलेले स्वयंसेवक आता conference call व google doc द्वारे ७०० लोकांचा कारभार सांभाळतात. स्नेहबंध मध्ये देखील आम्ही जुने व नवे याचा समन्वय साधायच्या प्रयत्नात आहोत. मुक्तपीठ, काव्य-शास्त्र-विनोदेन, सांगे वडिलांची कीर्ती, आई थोर तुझे उपकार अशी सदरे चालू करून सुजाण वाचकांना लेखक व्हायची स्फूर्ती देत आहोत. तसेच E-युगाला सामोरे जाउन "What's up on Whatsapp" हे सदर देखील चालू करणार आहोत !

हे मंडळ नाही तर एक मोठं कुटुंब आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या पहिल्या सभेत मंडळाचे अध्यक्ष श्री. सतीश डोंगरे यांच्याच शब्दात सांगायचे तर या कुटुंबासाठी "प्रचार, प्रसार आणि सभासदांचा सहभाग" मिळावा ही मायबाप वाचकांना विनंती!

---- ज्योत्स्ना दिवाडकर



आमचे अध्यक्ष,

श्री. सतीश डोंगरे आणि समस्त स्नेहबंध परिवारातर्फे

आमचे प्रायोजक आणि लेखकांचे

मन:पूर्वक आभार !

*लेखकांना, चित्रकारांना आणि संपादकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. लेखातून व चित्रातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सर सहमत असूच असे नाही; तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!*



Century 21 Town & Country

Selling or buying a home is perhaps the single largest transaction most of us will make in our lifetime.

Allow me the privilege of helping you with this decision.



***Prasanna Mohanachandran***

***REALTOR***

Office : (248) 524-1600
Mobile: (248) 670-1943
Fax : (248) 524-1427 *pm.*
*tcagents@gmail.com*

**Call now (248) 670-1943 (Cell)**

PCE Monarch

**Process Control & Engineering, Inc.**

**Monarch Design Company**

***Providing Turn-key Solutions for Facilities & Processes Since 1981***

PCE Monarch harnesses its strong engineering base and extensive project experience, in designing and implementing turn-key solutions for facility/process upgrades, achieving energy/cost savings and improving processes and quality of the products. We apply systems engineering principles to design and implement system-specific solutions.

Our experience from over thirty years with the manufacturing processes in automotive assembly plants enables us to offer similar solutions to other industries such as food and beverage, pharmaceutical, chemical and fresh/waste water treatment. PCE Monarch has the required engineering experience, in-house technical expertise, and experience of managing turn-key projects.

***What we can do for you:***

***Food Processing/Beverage Industry:***

- Clean room applications (air balance, filtration, humidity/temperature controls)
- Building Ventilation
- Fluid storage, conditioning, handling and delivery systems
- Bake ovens, dryers, cooling tunnels,
- Volatile Organic Compound (VOC) emission control systems
- Energy Savings Projects for Facilities and Processes
- Monitoring and Control Systems
- Design for sanitary system.

***Chemical plants, Paper & Pulp Mills:***

- Bulk Storage and Distribution systems.
- Design for sanitary, explosion proof requirements
- Pollution control systems for VOC's
- Filtration and Centrifugal Separator systems
- Compressed Air Systems

***Engineering*** Services' portfolio is based on our thirty years of experience in:

- Preparation of Engineering bid packages for new facilities and upgrades
- Health Assessment and feasibility study of facilities, equipment and processes
- Air, Fluid, Compressed air delivery systems
- In house design and drafting Support

Our customers include OEM's, suppliers and contractors, automation equipment providers and general manufacturing sector.

## "मला आवडलेलं पुस्तक"

लहानपणी निबंधाचे विषय ठरलेले असत. मला पंख फुटले तर,थोर स्वातंत्र्यसैनिक ,किंवा ग्रंथ हेच गुरू! शिक्षण चालू असताना गुरू भासणारे ग्रंथ किंवा पुस्तक केंव्हा माझे मित्र झाले कळलंच नाही .विनोदी साहित्याने मला हसवले तर आत्मचरित्रात्मक पुस्तकांनी विविध व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवले . गूढरम्य पुस्तकांनी विस्मयचकित केले .काही वास्तवदर्शक पुस्तकांनी मात्र अंतर्मुख केले.

नुकतंच असं एक पुस्तक लायब्ररीत मिळालं; वाचण्यास सुरूवात केल्यावर मनाला असं काही बेचैन केले की पूर्ण वाचल्याशिवाय पुस्तक खाली ठेववलं नाही . त्यातील भीषण वास्तव मला हादरवून गेलं . सुखासीन आयुष्य जगताना पायाला बोचलेला छोटा काटाही आपल्याला जीवघेणी कळ देणारा वाटतो. पण याच जगाच्या एका भागात माणुसकीला काळिमा फासणारे माथेफिरू नंगानाच घालतात आणि आपल्याला त्या अश्राप जीवांचा टाहो ऐकूही येत नाही!

डेबोरा एलिस लिखीत 'द ब्रेडविनर ' या पुस्तकाची मराठीत तितकीच हृदयस्पर्शी भेट घडवून आणलीय, अपर्णा वेलणकर यांनी ,मेहता पब्लिशिंग हाउसच्या अनुवादित पुस्तकात . स्वत: लेखिका डेबोरा एलिस टोरांटोच्या रुग्णालयात मनोरुग्णां साठी काउन्सिलिंग चे काम करतात . अफगाणिस्तानातील निर्वासितांसाठी पाकिस्तानात उभारण्यात आलेल्या छावणीत स्वयंसेवक म्हणून काम करताना त्यांना या कथेची नायिका " परवाना" ची बहीण व आई भेटल्या. परवानाची थरारक सत्यकथा त्यांनी शब्दबद्ध केलीय.

काबूल शहरात एका सुविद्य संपन्न कुटुंबातील परवाना ही तीन नंबरची मुलगी असते. तिचे वडील प्रोफेसर आणि आई उच्चविद्या विभूषित ,नोकरी करणारी ! चांगले घर ,गाडी ,नोकरचाकर अशा सुखी श्रीमंत कुटुंबात ती राहत होती.पण अफगाणिस्तानात यादवी युद्ध सुरू झालं,बाँबहल्यात घर जमीनदोस्त झालं आणि सर्व कुटुंबाची वाताहात झाली. वयात आलेला मोठा भाउ मारला जातो,वडिलांचा पाय कापला जातो आणि जीव वाचवत वाट फुटेल तिकडे हे कुटुंब धावत सुटते. पडक्या इमारतीतील एका अंधाऱ्या छोट्या खोलीत तालिबान्यांपासून लपून रहाण्याची शिक्षा त्यांना भोगावी लागते....वर्षानुवर्षे!!!डोक्यावर सतत तालिबान्यांची दहशत,बायकांना घराबाहेर पडायला बंदी ! अपंग वडिलांना आधार द्यायला छोट्या परवानाला बुरखा घेउन बाजारात जायला फक्त परवानगी होती,कारण घरातील मुलगा तान्हा होता. वडीलांबरोबर दिवसभर बाजारात घरातीलच किडुकमिडुक विकून ,पत्रे वाचून किंवा लिहून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नात कशीबशी हातातोंडाशी गाठ पडत असते , त्यातच तालिबान्यांना सुगावा लागतो की परवानाचे वडील इंग्लंडला शिकून आले आहेत! घरात घुसून सर्वांना जबर मारहाण करून वडिलांना फरफटत घेउन जातात...आजारी आई , लहान दोन भावंडं आणि वयात आलेली एक सुंदर बहीण यांच्या पालनाची जबाबदारी परवानावर पडते . तिची आई आणि एक बंडखोर मावशी तिला तिचे केस कापून मुलाचे कपडे घालून 'मुलगा' म्हणून बाजारात पाठवतात , आणि सुरू होतो परवानाचा संघर्ष जगण्याचा आणि जगवण्याचा!!

सुन्न करून टाकणारं क्रूर पशुत्व,घर नावाच्या अंधारकोठडीत बुरख्याआड कोंडलेल्या ,शिळ्या हवेत गुदमरलेल्या सूर्यप्रकाशाशिवाय फिकुटलेल्या स्त्रिया,खुरटलेली भावंडे आणि हे सर्व असहायपणे बघणारी शाळकरी परवाना! "तू माझी मलाला आहेस! अन्याय सहन न करणारी,शत्रूला धूळ चारणारी वीरांगाना आहेस! " या वडिलांच्या शब्दांनी बळ येउन दहशतीचं सावट झटकून,कुटुंबाला जगविण्यासाठी 'मुलगा' होउन घराबाहेर पडणाऱ्या परवानाने मला वाचनात खिळवून ठेवलं!!

बाजारात फेरीवाला बनलेली,पत्र वाचून दाखवणारी धिटुकली परवाना,घरच्यांसाठी बाजारहाट करणारी पडक्या इमारतीचे तीन तीन मजले चढून उरापोटी पाणी भरणारी इवलीशी परवाना!आपले छोटे हात सर्वांचे पोट भरु

शकणार नाही म्हणून कबरस्तानात मुडदे उकरून हाडं विकणारी,युद्धाच्या विध्वंसातही जगणं शोधणारी, शाळेत जाण्याचं, सुखी कुटुंबाचं स्वप्न पहाणारी परवाना ,लेखिकेनी विलक्षण ताकदीने उभी केलीय.

दुर्दैवाने कुटुंबापासून फारकत झालेल्या परवानाचा सगळ्यांना एकत्र आणण्याचा संघर्ष कधी संपणार? तिच्यासारखं बालपण हरवलेल्या हजारो मुलांच्या आयुष्यात सुखाचे क्षण कधी येणार?...

.पुस्तक संपलं पण माझं वाचन संपलं नव्हतं....!'द ब्रॅडविनर' या पुस्तक मित्रानं मलाअस्वस्थ केलं.आपल्या मऊसुत आयुष्यापलिकडल्या भीषण वास्तवानं मला अंतर्मुख केलं,म्हणून या परवानाची तुमच्याशीगाठ घालून दिली.पुन्हा कुठल्याही परवानावर अशी वेळ येउ नये यासाठी 'माणुसकी'हाच सर्वश्रेष्ठ धर्म व्हावा असा प्रयत्नप्रत्येकानं करायला हवा नाही का?

शंभर पानांच्या या पुस्तकात केवळ परवानाच नाही तर तिची आई नुरियॉ ,वीरा मौसी , बहीण शोझिया सार् यांचीच कहाणी हृदयाला स्पर्श आहे. नुकतीच पाकिस्तानातील शाळेतील क्रूर हत्याकांडाच्या बातमीने परवानाची पुन्हा एकदा आठवण झाली.खोट्या धार्मिक स्वामित्वाच्या अहंकारातून जन्म घेतलेल्या दहशतवादाने अशा हजारो परवानाच्या आयुष्याची वाताहात करणार् या नराधमांना कोण वेसण घालणार?

वाचकाला विचार करायला लावणारं हे पुस्तक तुम्हालाही नक्की आवडेल.

--- सौ. माधुरी चंद्रकांत पेंडसे.

---

Taal Academy
Learn the versatile Indian classical Kathak Dance
With
Manisha Dongre
Locations:
Bharatiya Temple, Troy & Hindu Temple, Canton
***** Special batches for Adults and Moms *****
Contact: Manisha Dongre at 248-740-5915
www.manishadongre.com

## Central Home Health Care, Inc.

**20245 W. 12 Mile Road, Ste. 100 Southfield, MI 48076**
**Tel: 1-800-698-5410 Fax: 248-569-5412**

**http://www.centralhomecare.com**

**Founded January 1985**
**Joint Commission accredited since 1991**
**Full time or contingent positions available for**
**Registered Nurses and Physical Therapists.**

*With best compliments of the Walvekar Family.*

# Property & Casualty Done Right.

At Heritage Insurance, we understand the importance of working together with the agent and the homeowner. From the smallest problem to a major disaster, Heritage Insurance will be there for you. We know the importance of building a long-term relationship with our customers. We are committed to a responsive customer service staff that will serve you quickly, and honestly.

Heritage Insurance is a company you can count on to be there when you need us most.



*Competitively Priced Products*
*Efficient Claims Handling*
*Recognized Financial Stability*
*Experienced Management Team*
*Committed to Your Success*

WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC. AND VIJAY WALVEKAR, ITS DIRECTOR.

HRTG LISTED NYSE

(855) 620-9978
www.heritagepci.com

HERITAGE® Insurance

*Pillars of Strength and Character.*


Call us Today!
to begin planning your next vacation!
Kenya
France
China
India
South Africa
Hong Kong
Cruises
-cruises
-tours
-packages
and more!
1-877-Fly-Jaya
359 5292
www.JayaTravel.com
JAYA
Travel & Tours

# माझा अमेरिकेतील पहिला दिवस

आज ५ जून २०१३! आज मला अमेरिकेला येऊन ४५ वर्ष पूर्ण झाली. काळ इतका भराभर गेला होता की माझा या देशातला पहिला दिवस अगदी नजरेच्या टप्प्यात होता...

१५ दिवसापूर्वी जेवणाच्या टेबलवर मी सहज याचा उल्लेख आमच्या अहोंना म्हणजे सुरेशला आणि माझ्या दोन्ही मुलांना फोनवर केला होता. त्यावेळी फक्त “Wow” एवढीच प्रतिक्रीया मिळाली होती. दुपार उलगडून गेली तरी घरात त्याचा उल्लेख किंवा मुलांचा फोनपण आला नव्हता. 'जाइ ना का' मनाने समजूत घातली.

अडुसष्ट साली मी एकटी एअर इंडियाच्या विमानात बसले. सगळं काही झटपट दीड दोन महिन्यांत झालं. त्या काळी लग्नापूर्वी क्वचितच मुली एकट्या परदेशी जात असत.

आमच्या डॉक्टर काकांच्या नवीन घराच्या वास्तुशांतीला इतरांसारखी मीपण मिरवीत होते. लग्नाचं वय झालं होतं. धाकट्या बहिणीला मागणी आली होती. आई, भाई (माझे वडील) जरा काळजीतच होते. आधीच वजन ८० पौंड. हातापायाच्या काड्या, लांबट चेहरा, modern styleचा केसांचा फ्रेंच रोल आणि बिनधास्त attitude. नेहमी माझ्या लांबट चेहऱ्याकडे बघून भाई थट्टेने म्हणायचे "रजू तुला कोणी गायतोंडेच शोधून द्यायला पाहीजे.." त्या काळी भारतात नवीनच सुरु झालेला फिझीकल थेरपीचा कोर्स मी पूर्ण केला होता.

पूजा आटोपली. जेवणं झाली. जेवणानंतर पंख्याखाली चटया टाकून सर्व बायका सुस्त गप्पा करत पडल्या होत्या. माझी आवडती सुमित्रा काकीपण तिथे होती. माझ्या साडीकडे पाहत कौतुकाने म्हणाली," रजू , हा ऑरेंज रंग तुला फार छान दिसतो. मुलगी दाखवायच्या वेळी हीच साडी नेस. तुला पटकन होकार येईल. हा रंग तुझ्यावर फारच खुलतो.”

"आहे का कोणी माहितीत? रजूला डॉक्टर नवरा मिळावा असं आपलं मला वाटतं." आईने तेवढ्यातच बोलायचा चान्स घेतला होता. "नाही हो कोणी माहीत. पण माझ्या ओळखीचे एक गृहस्थ हात व पत्रिका बघतात. त्यांच्याकडे मी रजूला घेऊन जाऊ का?" त्या काळी कोणी हात बघतो म्हंटल की माझा हात पुढे व्हायचा.

आणखी एका आठवड्यातच एक दिवस नक्की करून मी व सुमित्राकाकी मुसुरेकरांना भेटायला निघालो. बॉम्बे सेन्ट्रलला राहत होते ते. दरवाजाची बेल वाजवताच एका मुलीने दरवाजा उघडला. समोर चटईवर चष्मा लावलेले एक गृहस्थ बसले होते. मागे मोठा देव्हारा होता. बाजूला अक्कलकोट स्वामींचा फोटो होता. उदबत्तीचा मंद सुवास दरवळत होता. समईपण तेवत होती.

मी चपला काढून उंबरठा ओलांडायच्या आधीच ते म्हणाले," काय ताई लग्नाचं विचारायला आलात की फॉरेनला कधी जातो ते बघायला आलात?" सुमित्रा काकीचा चेहरा उजळला. तिने मोठ्या कौतुकाने माझी ओळख करून दिली. औपचारिक इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर ते म्हणाले," ताई तुम्हाला लग्नाचा योग इतक्यात नाही. पण ह्या जूनच्या दुसऱ्या आठवड्यानंतर तुम्ही या देशात नाही. तुम्ही या चार दिवसात एक पत्र लिहाल, ज्याचे उत्तर तुम्हाला १०-१२ दिवसांत येईल आणि जूनमध्ये तुम्ही नक्कीच परदेशी असाल.”

त्यांचा निरोप घेऊन परत येताना मी विचार करत होते की फॉरेनला मी कोणाला पत्र लिहू? मी फ़िझिओथेरपी पास झाल्यानंतर अमेरिकेत कॅलिफोर्नियाच्या "मार्गारेट ऊर्फ Magee not " नावाच्या जगप्रसिद्ध बाईकडे post grad कोर्सची admission घेऊन ठेवली होती. त्या कोर्ससाठी मी ६ वर्ष वेटिंग लिस्ट वर होते. त्या रात्री बसून मी तिला पत्र लिहिलं.

....पुढील लेख पान क्र. १२ वर


Smile Centers P.C
Talk about smiles ...
SMILE CENTERS
FAMILY DENTAL
248 313 8000
Dr. Sirisha Nemallapudi
TROY:
4000 Livernois Road
FARMINGTON:
36650 Grand River Ave.
GRAND OPENING OF FARMINGTON HILLS
Family and Cosmetic Dentistry
Crowns, Bridges and Implants
Invisible braces "Invisalign"
Root Canal treatment
Porcelain Veneers and Lumineers
Open Late Evenings And Weekends
FREE
TEETH WHITENING
(Reg. $450)
For New Patients With Exam, X-Rays And Cleaning
Orangehart Records
Amway Distributors
Grand River Ave
www.smilecenters.us
Info@smilecenters.us

त्याचं होकारार्थी उत्तरपण मुसुरेकरांनी सांगितल्याप्रमाणे १०-१२ दिवसांत आलं आणि म्हणता म्हणता माझी अमेरिकेची तयारी सुरू झाली. ५ जून तारीख ठरली. तिकिटाला ३००० रुपयांची गरज होती. आमचे भाई जुन्या वळणाचे. त्यांनी रोखून सांगितलं , " आम्हाला अमेरिका बमेरिका नको. तू आपली लग्न कर आणि नवऱ्याबरोबर कुठेही जा." मी अगदी हिरमुसले. त्या काळी आमचं एकत्र कुटुंब होतं. तीन काका, त्यांची family, आत्या धरून घरात वीसजण होतो. माझे डॉक्टर काकाच माझ्या मदतीला धावले. त्यांनी भाईची समजूत घातली. "अरे आपल्या मान्द्रेकर कुटुंबापैकी ही पहिलीच अमेरिकेला स्वतःच्या कर्तबगारीवर जाते आहे. तिला अडवू नकोस तू, नाहीतर आम्ही काढू तिचं तिकीट!"

मग काय, ५ जून तारीख ठरली. भाईपण travel agent कडे माझ्याबरोबर आले. आईच्या डोळ्यात पाणी आलं. "रजू , लांब जाते आहेस तू. दर आठवड्याला पत्र पाठवत जा!" देवीला नारळ ठेवून गाऱ्हाणं घातलं गेलं. एअरपोर्टवर पोहोचवायला निदान ३० जण हार तुरे घेऊन आले होते.

माझी admission कॅलिफोर्नियाच्या Vallejo गावी होती. Mageeच्या पत्रात फक्त चार ओळी सूचना होत्या.
"सान्फ्रान्सिस्कोला उतरून greyhound बसने ३० मैलावरील Vallejoला उतरा. बस डेपोहून हॉस्पिटलला जायला बस घेतली तर २५ सेंट्स आणि कॅब घेतली तर $१.२५ पडतील."
त्या काळी भारत सरकार फक्त ७ डॉलरच चलन देत असत. ते सात डॉलर व Mageeच्या सुचनेचे पत्र पर्समध्ये ठेवून मी ५ जुन १९६८ रोजी मुंबई सोडली.
१८ तासांच्या कंटाळवाण्या प्रवासानंतर मी सान्फ्रान्सिस्कोला उतरले. प्रवासात चुरलेली जरीची साडी, खांद्यावर ………. छापाची एअर इंडिया bag, पर्स व ४० पौंडाची, बिनचाकाची न पेलवणारी सुटकेस असा माझा अवतार होता.

प्रथम वेस्टर्न युनिअन दिसताच आईला सुखरूप पोहोचल्याची तार केली. त्याला पडले $३. सातपैकी $४ बाकी राहिले. Mageeच्या पत्रानुसार छोटा stipend मिळायचा होता व फुकट डॉर्ममध्ये राहायची सोय होती.

एअरपोर्टला greyhound बसची पाटी काही दिसत नव्हती. आजूबाजूच्या ४-५ जणांना अदबशीरपणे greyhound बस कुठे मिळेल असं विचारलं. ती चक्क शिष्टपणे "सॉरी" म्हणून निघून जात होती. ती मोठ्ठी ४० पौंडांची सुटकेसही उचलवत नव्हती.

शेवटी एका निग्रो माणसाला माझी दया आली. काळ्या लोकांना निग्रो म्हणत नाही हे कुठे माहीत होतं. त्याने सांगितलं एअरपोर्टच्या बाहेर शटल बस घे व त्याला सांग तुला Greyhoundला सोड. जीव भांड्यात पडला माझा. देवदूतच वाटला. त्याने माझी सुटकेसपण एअरपोर्टपर्यंत नेऊन दिली. मी शटल बस घेऊन greyhound टर्मिनसला उतरले. जिकडे तिकडे बसेस फलाटाला लागल्या होत्या. मी Vallejo ची पाटी कशीबशी शोधून काढली. बसच्या रांगेत उभे राहीले.
थोड्या वेळात बस आली. एक माणूस सर्वांचं सामान आत चढवत होता. ड्रायव्हर बसमध्ये चढायच्या दरवाजावर तिकीट गोळा करत होता. माझी कल्पना होती की भारताप्रमाणे बसमध्ये तिकीट मिळत असावं. मी ओशाळून म्हणाले " मला नाही माहीत तिकीट कुठे मिळतं ते." त्याने माझा नवशिकेपणा ओळखला असावा. तोही भला माणूस निघाला. तो म्हणाला तू ऑफिसमध्ये जाऊन लवकर तिकीट घेऊन ये. तोपर्यंत मी बस थांबवतो. मात्र लवकर परत ये.” तिकिटाला पडले २५ सेंट, मनाने नोंद केली आपल्याकडे $३. ७५ बाकी आहेत. बसमधे चढल्यावर Magee च्या सूचना आठवल्या, Vallejo गाव San Francisco पासून ३० मैलांवर होतं. ३० मैल जायला बसला किती वेळ लागतो हे कोठे माहीत होतं.डोळेही भारत अमेरीकेच्या १० तासाच्या फरकाने पेंगुळले होते. माझ्या गावठी उच्चारात मी ड्रायव्हरला विनंती

....पुढील लेख पान क्र. २० वर


YOUR
RELIABLE
REALTOR
PIYUSH DAVE
Ranked in Top 1% Realtors Nationwide!
Cell 734-620-2233
RESIDENTIAL
COMMERCIAL
INVESTMENT
IT'S YOUR FUTURE,
CALL THE EXPERT,
MAKE THE RIGHT MOVE!
Email - dave@pdave.com, Website - www.pdave.com
Cell - 734-620-2233
BROKERAGE WITH REAL ESTATE ONE (734) 455 7000


Maharashtra Mandal of Detroit
Makar Sankrant Celebration
February 7th 2015 at 5PM
Jab We Met
A Musical
Conceptualized & Produced locally by our own proud members, led by Jaideep Bangal
Venue –
Novi High School
24062 Taft Road,
Novi, MI 48375
Program –
5:00pm : Jab We Met – A musical
Request all to be seated by 4:50pm
6:45pm: A special General Body meeting
7:30pm : Dinner
8:30pm : Dandiya Dhamaka
9:30pm : Close
Dinner followed by Dandiya Dhamaka led by Amit Deshpande & team
RSVP OPENS Jan 15th 2015 on www.mmdet.org
Charges –
Deluxe members : FREE [RSVP requested]
Basic Members : $10/person
Members of A2MM (any category): $10/person with RSVP, $15/person at the door
Non-members : $15/person
Parents of Deluxe members : $10
Kids under the age of 5 : FREE
आपले मंडळ, महाराष्ट्र मंडळ
Please contact Manjiri Joshi at manjiri.joshi@mmdet.org, if you have any questions.

# Detroit Volunteering Event 2015



# एक प्रसन्न अनुभव

मराठी वाचक व लेखक मित्र मैत्रिणींनो,

ई साहित्याच्या या विश्वात आपले स्वागत आहेमिळवण्याचे एकमेव आणि सोपे ई साहित्य हे मराठी पुस्तके विनामूल्य . .साधन आहेआज आम्ही आपल्यासाठी जे पुस्तक आणलं आहे ते आहे एक आत्मकथा. प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची दुर्दम्य जिद्द असणाऱ्या एका मराठी तरुणाची कथा.

ही श्रीची इच्छा : लेखक डॉ. श्री ठाणेदार




बेळगावी एका डेंटिस्टकडे साफ़सुफ़ीसकट सगळी वरकामं करणारा हा निम्न-मध्यमवर्गीय मुलगा अमेरिकेतला एक बडा बिझनेसमन म्हणून कसा नावारुपाला आला त्याची कथा. आत्मकथा. सत्यकथा. समस्त गुजराथी-पंजाबी-मारवाडी बिझनेसमनना मागे टाकून अमेरिकेत मराठी व्यावसायिकतेचा झेंडा उभारणारा हा मुलगा, त्याचं वैयक्तिक जीवन, त्याच्या आयुष्यातील संकटं, थरार आणि आनंदाचे, विजयाचे क्षण यांचं एक सुंदर चित्रण. एखाद्या हॉलिवूड सिनेमात शोभेल अशी कथा. खऱ्या मराठी बाण्याची.

२०१५ या वर्षात ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े मराठी मुलांना व्यवसायासाठी प्रेरणा देणारी पुस्तकं देण्याचे आणि मार्गदर्शक ठरतील असे कार्यक्रम करण्याचे योजतो आहोत. धंदा किंवा व्यवसाय म्हणजे फ़क्त पैसे कमावणं नव्हे. ती एक नवनिर्मितीच आहे. रोजगारांची निर्मिती. स्वतःबरोबर असंख्य लोकांचं कल्याण करण्याची एक संधी म्हणून व्यवसायाकडे पहा. अनेक कुटुंबांना पोसण्याची एक संधी म्हणून पहा. एक धुंदी चढवणारा खेळ म्हणून पहा. एका नव्या देशाची उभारणी करण्याची संधी म्हणून पहा. आपल्या कस्टमर्सची, समाजाची सेवा करण्याची, त्यांना उत्तम प्रतीची सेवा, नाविन्यपूर्ण वस्तू उपलब्ध करून देण्याची संधी म्हणून पहा. नवीन जग उभारणीतील आपला वाटा, आपला ठसा उमटवण्याची एक संधी म्हणून पहा.

जास्तीत जास्त तरुण मुलांना आणि विद्यार्थ्यांना या कार्यक्रमांत सहभागी करण्याचा आमचा मानस आहे. आपल्या आसपासच्या तरुण विद्यार्थ्यांना आमच्या या कार्यक्रमांची माहिती देऊन, व त्यांना ई साहित्य प्रतिष्ठानचे सभासद

....पुढील लेख पान क्र. १८ वर

# SAI

## Sweets of India and Fast food

The Only Pure Vegetarian Restaurant In Troy

4917 Rochester Road, Troy, MI - 48085

Sunday - Wednesday 11am to 9pm, Thursday - Saturday 11am to 10pm

248-457-9800 / Cell 313-550-4198

Web: www.saisweetsofindia.com

| | |
|---|---|
| Sweets [More than 25 varieties] | Jain Food Available |
| North Indian | South Indian |
| Chaat | Snacks |
| Indo Chinese | Special Thali |
| Desserts | Drinks |

Sabudana Vada served with advance order

## Catering

Services for all occasions: Birthdays, Weddings, Graduations, etc.

Made to Order – Prepared on site

| | |
|---|---|
| Dosas | Chat Stations |
| Jalebi | Chole Bhature |

Lunch Buffet Tuesday – Sunday: 12pm – 3pm

Special Chat Buffet – Every Thursday Evening

करून  आपणही या मोहिमेत सामिल व्हावे. मराठी मुलांनी यशस्वी उद्योजकांची चरित्रं वाचावीत. वाचावीतच. पण तिथेच न थांबता स्वत:चं आयुष्य यशस्वी घडवून स्वत:ची आत्मचरित्रं लिहावीत. नुसतं 'जय महाराष्ट्र' म्हणून घोषणा दिल्याने महाराष्ट्राचा जय होत नाही. त्यासाठी स्वत:पासून, स्वत:चा जयघोष करण्यापासून सुरुवात करावी लागते. महाराष्ट्राची आणि मराठी माणसांची प्रतिमा बदलायला लागू. त्याची सुरुवात आज "ही श्रीची इच्छा" या पुस्तकापासून करीत आहोत. मराठी माणसाच्या हृदयाजवळचा हा मंत्र आहे. नेमकं त्याच नावाचं पुस्तक तुमच्या हाती देताना आज आम्हाला अभिमान वाटतो आहे.

या पुस्तकाच्या आजवर चाळीसहून अधिक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. लाखो वाचकांनी वाचलेलं आणि नावजलेलं हे पुस्तक जून लाखो वाचकांपर्यंत जावं अशी इच्छा आहे.

---- डॉ. श्री ठाणेदार

To download a free copy of this eBook, please visit
www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hsi_st_final.pdf

---








---- मेधा उमरजी

**उभे शब्द**

१. सृष्टीचा निर्माता
२. राजकीय फतवा, आदेश
३. अल्पकाळ
४. मंडळ, सभोवतालचे लोक
६. ह्याची धाव कुंपणापर्यंत
७. हुक्की
९. पांथस्थ
१०. विनाश काले ........ अशी बद्धी होते
१२. कठीण प्रसंग

१४. नक्कीच, निश्चित
१५. आगामी
१८. जक्ख म्हातारा
१९. आनंदाचा घोष

**आडवे शब्द**

१. भीणाऱ्याच्या मागे हा लागतो
५. समज
६. कागदावर सोडलेली जागा
८. मरण, मृत्यू
१०. आनंदावर हे पडले, की सगळी मजा जाते
११. वशिला
१२. गरीब बिच्चारा
१३. बरोबर काम करणारी
१६. एक आरोग्यास अपायकारक धुम्रपानी गोष्ट
१७. सोय
२०. कासव
२१. कामदेव
२२. बेंबीच्या देठापासून ओरडणे

केली की Vallejo येताच मला सांग. साध्या साध्या गोष्टींची मला काही माहिती नव्हती.
Vallejo ला बस येताच मी उतरले. Mageeच्या सुचनेप्रमाणे हॉस्पिटलला जायला बस कुठे मिळेल म्हणून चौकशी केली. एक म्हणाला आज रविवार म्हणजे सबथ डे(Sabbath Day). आज सर्व ऑफिसेस, दुकाने,बसेस बंद असतात. बोटाने इशारा करत म्हणाला, तू दोन ब्लॉक त्याबाजूला गेलीस तर एक पिवळा पोल आहे तिथे Cab येइल. त्यावेळी ब्लॉक म्हणजे काय हे तरी कुठे माहित होतं . मी कशीबशी माझी ४० पौंडची बिनचाकी सुटकेस ढकलत त्या दिशेने चालू लगले. आजूबाजूला शुकशुकाट, एक चिटपाखरू दिसत नव्हतं.

पुढची १५ मिनिटे कॅबची वाट बघण्यात गेली. दुरून एक माणूस येताना दिसला. जवळ येताच मी अदबीने विचारलं कॅब लवकर कशी मिळेल. तो शिष्ठपणे चालत राहिला. जाताना पुटपुटला " I am also new ".
आणखी १० मिनीटं गेली. कडक उन्हात डोकं कणकणू लागलं होतं. तेवढयात एक गाडी माझ्या दिशेने येताना दिसली आणि नेमकी माझ्या समोर थांबली. आत भडक रंगाचे शर्ट घातलेले दोन काळे पुरुष होते. मी नवीन पाहुणी आहे हे बहुतेक त्यांनी ओळखलं असावं. "Come on baby , come on in" म्हणत एकाने खिडकीच्या बाहेर डोकं काढलं. मी त्यांच्या गाडीत चढावं म्हणून हाताच्या व मानेच्या झटक्याने इशारा करीत होता.

अमेरिकन फ्रेंडली असतात असं पूर्वी कोणी सांगितलं होतं, हा त्यातलाच नमुना असावा. कुठेतरी मनात पाल चुकचुकली आणि मी "No. Thank you". म्हणाले. पुढची १० मिनिटं आपल्या जाड्या आवाजात मला लिफ्ट घ्यायचा आग्रह करीत होते. मात्र मला त्यांनी गाडीत चढायची बळजबरी केली नव्हती एवढंच! त्यांची नजर चुकवून मी देवीचा धावा करत होते. जरा वेळानी कंटाळून असावं, त्यांनी गाडी चालू केली आणि मला धमकी दिली, " तू आता Vallejo मध्ये आहेस. आम्ही नक्कीच तुझी परत भेट घेऊ".
बाजूच्या कोपऱ्यात त्यांची गाडी वळताना दिसली आणि उलट्या दिशेने एक मोठी निळी गाडी येताना दिसाली. गाडीवर मीटर नव्हता व गाडी दुरंगी नव्हती. ही taxi असावी का अशी शंका मनात आली. त्याने गाडीची (Trunk) डीकी उघडून सराईतपणे माझी मोठी bag आत ठेवली व मागचा दरवाजा उघडून मला आत चढायच इशारा केला. मी त्याला Magee च्या सूचनेचे पत्रक दाखवले. "यस मॅम" करत त्याने गाडी चालू केली.
गाडीतील मीटर चालू करत तो आपल्या मेन ऑफिसला report देऊ लागला, "चेरी (Cherry) जेफरसनच्या कोपऱ्यावर एक passenger पिक अप केला आहे." तिने funny dress घातला आहे. रॅंजर!"
मला हि पद्धत माहिती नव्हती. मला वाटलं त्या दोन काळ्या माणसांपैकी रॅंजरचा हा साथीदार असावा. मी बिथरले, त्याला म्हणाले आत्ताच्या आत्ता ही गाडी थांबव. मला पोलीस पाहीजे. तुला माझं इंग्लिश समजतंय का? मी fast तर बोलत नाही ना? इ. इ. ड्रायव्हरला कळेना मी इतकी अस्वस्थ का झाले. तो म्हणाला, " तू घाबरलेली दिसते आहेस. ह्या गावी परदेशातून बऱ्याच मुली येतात. त्या ज्या होस्टेलवर राहतात तिथे मी तुला पोहोचवतो. आणि खरच होस्टेल येताच त्याने मला सुटकेससकट खोलीवर पोहोचवलं . उरलेले $३.७५ मधला सव्वा डॉलर त्याला दिला आणि हुश्श करत बेडवर बसले. मी पहिल्या दिवसाच्या आठवणींच्या भोवऱ्यात गुरफटलेले होते. दरवाज्याची बेल दोन तीनदा वाजली असावी. भानावर येउन दरवाजा उघडला. एक माणूस मोठ्ठा लाल गुलाबाचा गुच्छ द्यायला आला होता. त्या गुच्छासोबत आलेलं कार्ड कुतूहलाने वाचलं. त्यात लिहिलं होतं. "पान्चेचाळीश वर्षांपूर्वी केलेल्या तुझ्या धडाडीबद्दल तुझं अभिनंदन. "We Love You " - सुरेश, आशिष, श्वेता, अनिता. डोळे भरून आले. "I love you too!

---- रजनी सुरेश ओक.
Toledo, OH

# THE "NEW KID, NEW HOME, NEW TAX BRACKET" CHALLENGE

A Prudential financial professional can assess your situation. Draw up a strategy. And help you build a secure future.
**To learn more, call me today.**



**Rachna Kumar**
**Financial Professional**
**The Prudential Insurance Company of America**
**101 W Big Beaver Rd #705**
**Troy, MI 48084**
**Office 248-688-3694**
**Cell Phone 248-835-2528**
**Rachna.Kumar@Prudential.com**
**www.prudential.com/us/rachna.kumar**



Prudential
Bring Your Challenges®

INVESTMENTS | INSURANCE | RETIREMENT

Insurance issued by The Prudential Insurance Company of America, Newark, NJ and its affiliates. Securities products and services are offered through Pruco Securities, LLC. Neither Prudential nor its sales professionals offer tax or legal advice. Consult with your own Attorney or Accountant regarding your particular situation. Each company is solely responsible for its own financial condition and contractual obligations. ©2014 Prudential Financial, Inc. and its related entities. Prudential, the Prudential logo, the Rock symbol and Bring Your Challenges are service marks of Prudential Financial, Inc., and its related entities, registered in many jurisdictions worldwide.
0223059-00005-00

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

# Khatri Sir and Gymnastics

I was extremely anxious. This return journey on Chaddar trek (walking on the frozen Zanskar River in Ladakh) had turned into a huge challenge. At one point on a long icy treacherous patch, despite all precautions, I finally had a spectacular Charlie Chaplin style fall. My legs slipped, for a fraction of a second I noticed that my entire body was 3-4 ft up in the air, and then I came crashing down. But within five minutes, I was back on my feet limping along in pain, cracking jokes and taking photos. At the camp that evening, one fellow trekker asked me, “How the hell do you manage this pain, man?” I told him, “There is simple one word answer: Khatri-sir.”

Khatri sir…. barely five foot, stocky guy. Baldy, clean-shaven Gurkha face. Classic army person, rough and tough, chain smoker, one who would not tolerate any jokes and would never smile. Almost always, he would wear a brown T-shirt and grey pants, as if these clothes were part of his stocky body itself. Yes, he was our Gymnastics coach in IIT-Bombay.

I was a freshie when I saw Khatri sir for the first time. I was wandering around the gymkhana, and heard someone screaming, “Thirty more seconds… Thirty.., Twenty nine...” Five pathetic souls were lying flat on their backs and were trying desperately to hold their legs at a 60 degree angle clenching their hands with quivering bodies. Khatri sir was also clenching…. his chappal in his hand, and was ready to hit anybody who failed to hold their position. I wondered, “What the hell is going on? What kind of suckers would want to endure this torture?” When Gymnastics session ended, I happened to chat with Khatri sir. He told me in his crude Hindi, “One day, you will become a big sahib in your life. You will encounter lots of stress and pain. At that time, you will remember Gymnastics and me. You will learn to “enjoy” pain.” Wow! What a philosophy!

Guess what? The next day, people saw one new guy trying to hold his position clenching his hands and getting hit by Khatri sir’s chappal. A new sucker had joined Khatri’s team.

His methods of fixing our injuries and health problems were also crude, ruthless and consistent with his philosophy of training students to “Enjoy the life while in pain”. We were preparing for the Inter-IIT meet in Delhi in 1979 (I think!). Sudhir was a sure shot gold medal winner for the horizontal bar with his fancy grand circles. But ten days before the competition in the sports camp, he developed a huge blister on his palm. He was in pain and could not bear to perform grand circles any more. One fine morning, before anybody could realize, Khatri sir ignited some newspaper (with his cigarette lighter, of course) in his bare hands and pressed the burning wad hard into Sudhir’s palm. Holy cow!! Sudhir screamed, we were in shock, we could not believe our eyes. And Khatri sir

in his calm voice said, “Everything will be fine.” Yes, the blister did open up, Sudhir was rushed to the hospi, they did dress up his wounds with bandages, and in the end, Sudhir actually ended up performing grand circles on horizontal bar while in freaking pain.

In another sports camp, many other coaches (Hockey, Football, Basketball etc.) had to go to the city for some conference. Early in the morning at 7 am, they handed over their boys to Khatri sir and said, “Khatri saab, can you please get the boys to do some warm-up? After that, they will go and practice their own games.” Neither the coaches nor their students were aware of what they were getting into. Khatri sir’s standard warm-up used to be so intense! 800 m sprint, tens of two-hand and one-hand push-ups (yes, one-hand push-ups are possible when Khatri sir is standing next to you with a chappal in his hand), hundred sit-ups, going up and down on MB (main building) staircases… all of these in just 45 min while Khatri sir is screaming at top of his voice. It was inevitable that after this “Khatri warm-up”, one could barely stand on his own legs. Obviously, instead of “practicing their own games”, all these teams staggered back to their own hostel rooms to rest.

So, that was Khatri sir… a terrorizing coach, and his blood-curdling, horrific incidents! Over time, however, one could start to understand another, more compassionate side of his character. We all were somewhat awkward, physically little too matured individuals for Gymnastics, who had suddenly discovered our love for this sports, may be a dozen years too late. Even learning the simplest exercises was a struggle. But even as a 60 year old, Khatri sir provided firm physical and mental support to ensure that we are not injured during training. Imagine leaping backward during a back flip or a back somersault with a real danger of landing on your head or your neck with a potential body-crippling injury. But over time, we developed complete faith in Khatri sir to protect us, sometimes risking himself in the process. Even now in our fifties, when Suhas can still do a back flip, Sanjiv can do a press hand-stand, I can harden my tummy to withstand hard hitting punches from my teenage kids, or even when we reach our professional meetings on time, we remember Khatri sir!

Despite his tough demeanor, he definitely tolerated pranks by some of us, especially Milind. Occasionally, Milind would disappear in the middle of Gymnastics session. Sometimes, we used to disappear with him as well. Some of our craziest surreal experiences in IIT happened along with Milind during such disappearances.

For example, how many IITans have experienced catching fish in overturned umbrellas? Or how many of you have actually caught, cooked and eaten multiple animals in one meal? During first monsoon showers, fish would start moving upstream from Powai lake through the drainage canals near Hostel 8. This canal flowed under the road through a culvert. Fish would have to leap up into the culvert just to continue their upstream journey. Under Milind’s leadership and innovation,

many of those ambitious fish landed up in cleverly positioned overturned umbrellas and later on our dinner plates. How can this innovation be any less profound than Heisenberg's uncertainty principle that we were learning in PH301 during the same summer? Incidentally, during that same summer, we caught, cooked and ate crabs and frogs as well! (But that is another profound and long story!!)

Well, unfortunately gone are those days! And gone is Khatri sir! Couple of years after our graduation, we heard that Khatri sir was sick with rapidly progressing throat cancer. We all went to meet Khatri sir at his home on the IIT campus. His eyes were weak. He had lost his voice, lost his fight. He could barely lift his hand. His forced smile filled us with sadness. His stocky body frame was gone, crude Hindi was gone, this constant fixture of Khatri sir in our lives was fading away. We were not used to seeing Khatri sir in this manner! He was trying to write on the nearby crumpled paper, "Stay well!" And we, a bunch of twenty year old kids, were facing teary emotions that we were not familiar with.

Sir, after thirty years, we are staying well, enjoying pains of our lives, occasionally remembering you, remembering those days…! As Milind says, "बंदर बुढ्ढा भी हो गया तो भी गुलाटी मारना नहीं भुलता।" (However old a monkey is, he doesn't forget his tricks!)

**---- Nitin Anturkar**




## दिसामाजि काही तरी ते लिहावे …

आम्हाला लेख हवे आहेत स्नेहबंधसाठी !
तुमच्या प्रतिभाला आमच्या अंकात वाव
आहे. कशावर लिहू असा प्रश्न पडत असेल तर आम्ही सुचवतो .

१) 'काव्य - शास्त्र- विनोदेन' : आवडलेले पुस्तक, चित्रपट, नाटक किंवा कविता यांचे रसग्रहण.
२) 'सांगे वडिलांची कीर्ती' : तुमच्या बाबांची एक आठवण
३) 'आई थोर तुझे उपकार' : अर्थात, आईची आठवण
४) 'आजीबाईचा बटवा': आजीच्या किवा आईच्या स्वयंपाकघरातील पाककृती
(Aren't you tired of 'ricotta cheese turned paneer' recipes?) किंवा घरगुती औषध.
५) 'मुक्तपीठ': तुम्हाला हवे ते! तुमची प्रतिभा आमच्या विषयांच्या कक्षेत बसलीच पाहिजे असे नाही!

# Sistar Mortgage

Minimizing Cost, Maximizing Investment

## About us:

Sistar Mortgage, headquartered in Shelby Township, Michigan, is a HUD-approved Correspondent Lender licensed in 25 states with branches in Texas, California, Washington and Kansas. We offer Conventional and Jumbo financing as well as FHA, Rural Development and Renovation loans.

We believe that maintaining high standards, utilizing the best technology platforms and creating a positive, customer-focused business model truly sets us apart in today's mortgage industry. We strive to become an advocate for our customers and gain the trust that earns us a customer for life.

- Investment Properties, Second Homes and Vacation Homes
- Home Equity Loans
- Jumbo loans up to 90% LTV
- Extensive experience with Self-Employed borrowers
- Specialized in borrowers with U.S. Visa types: H1B, EAD, E1, L1 and TN

**Contact us today to learn about the Sistar Mortgage personal approach to Minimizing Cost, Maximizing Investment for our customers.**

**www.SistarMortgage.com • 888.841.4238**
**NMLS#: 68434**



Dhake Industries

**Manufacturers of Interior & Exterior Automotive Coatings**




**One Company, One Solution**

*The Future of Coatings*

15169 Northville Rd. • Plymouth, MI 48170 • 734-420-0101 • Fax: 734-420-3210
www.dhakeindustries.com

*Congratulations to*

## Maharashtra Mandal of Detroit

*From*

*Avinash & Hema Rachmale*

*of the Lakeshore Group of Companies*

LAKESHORE GLOBAL

**Lakeshore Global**

**Infrastructure Contractors**

SKY

**Sky Group Grand, LLC.**

**Real Estate Group**

LHG

**Lakeshore Healthcare Group, Inc.**

**Nursing Home & Managed Care**

7310 Woodward Avenue, Detroit Michigan, 48202
313.989.4141 www.lgccorp.com/www.lakeshorehealth.com